## नि. दि. दा. क्रं. नं.६/२०१२ नि. नं. ८८ वरील आदेश

CNR: MHST14-000060-2012

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया सहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता केलेला आहे. वादीच्या अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकती संबंधाने जाहीर ठराव, निरंतर ताकीद व अन्य दादी मंजूर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी वादीविरुध्द प्रतिदावा दाखल करुन त्यामध्ये वादी विरुध्द निरंतर ताकीद व जाहीर ठराव करुन मागीतलेला आहे. दावा पुराव्यावर प्रलंबीत असतांना, प्रतिवादी क्रं.१ यांचे दि.०९/०८/२०१७ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर येणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये मयत प्रतिवादी क्रं.१ यांच्या नावापुढे मयत वारस असे नमुद करुन, १अ. श्रीमती लक्ष्मीबाई शशिकांत शिंदे, वय ५० वर्षे, धंदा – शेती, १ब. श्री. गणेश शशिकांत शिंदे, वय ३३ वर्षे, धंदा – शेती, १क. दिनेश शशिकांत शिंदे, वय ३२ वर्षे, धंदा – शेती, नं.१अ ते १क सर्व रा.अडत वस्ती, वेळापूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर हा मजकुर समाविष्ट करण्यास परवानगी मिळावी, ही विनंती.

३. प्रतिवादी क्रं.१अ ते १क यांच्या वारसांतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन, अर्जातील कथने नाकारलेली आहेत. वादीने दिवाणी प्रक्रिया सहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दिलेला अर्ज हा चालण्यास पात्र नाही. वादीने दिवाणी प्रक्रिया सहिता आदेश २२ मधील तरतुदी अन्वये अर्ज देणे आवश्यक होते. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

४. अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रतिवादी क्रं.१ हा दि.०९/०८/२०१६ रोजी मयत झालेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहिले असता, मयत प्रतिवादी विरुध्द दाव्याचे कारण अस्तित्वात राहते. मयत प्रतिवादी क्रं.१ चे वारस अभिलेखावर येणे, आवश्यक आहे. मयत प्रतिवादी क्रं.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब नि.८६ वरील आदेशा अन्वये माफ करण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये मयत प्रतिवादी क्रं.१ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करत असतांना, त्यावर दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ प्रमाणे असे नमुद केले म्हणून अर्ज नामंजूर करणे उचित वाटत नाही.

एकंदरीतच दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्रं.१ यांचे वारस अभिलेखावर घेणे व त्या संदर्भात दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. निव्वळ तांत्रिक गोष्टीमुळे अर्ज नामंजूर करणे मला उचित वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज नि.८८ मंजूर करण्यात येतो.

२) वादीस मयत प्रतिवादी क्रं.१ याचे वारस अभिलेखावर घेण्यास व त्या संदर्भाने दाव्याच्या सरनाम्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणेत येते.

३) वादीने दाव्याच्या सरनाम्यामध्ये अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

फलटण.
ता.०४/१०/२०१८.

(व्ही. जे. जाधव)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर फलटण.